# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २७८ - २२** **दिनांक १५/०९/२०२२**

## ऑक्सिस बँकेच्या कस्टमर केअर मधून बोलत असल्याचे भासवून फसवणूक झालेली रक्कम रु. ५५,०००/- परत मिळविण्यात सायबर गुन्हे शाखेस यश

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील भाईंदर (पुर्व) येथे राहणाऱ्या महिला तक्रारदार यांनी त्यांचे ॲक्सिस बँकेचे क्रेडीट कार्ड चालू करण्यासाठी त्यांच्या मोबाईलवरुन गुगलवर उपलब्ध असलेला कस्टमर केअरचा संपर्क क्रमांक शोधून त्यावर संर्पक केला असता तक्रारदार यांना त्यांच्या मोबाईलवर प्राप्त झालेला ओटीपी नंबर हा कस्टमर केअर वरील इसमाने विचारल्याने तो तक्रारदार यांनी त्यास शेअर केल्याने तक्रारदार यांच्या ॲक्सिस बँकेच्या खात्यातून रक्कम रुपये ५५,०००/- ही डेबिट झाल्याचा संदेश प्राप्त झाल्याने त्यांनी केलेला तक्रारी अर्ज चौकशीकामी सायबर गुन्हे शाखेस प्राप्त झाला होता.

सदर तक्रारी अर्जाचे अनुषंगाने सायबर गुन्हे शाखा यांनी तक्रारदार यांचे ॲक्सिस बँक्या खात्यातील बँक व्यवहाराबाबत चौकशी केली असता सदरची रक्कम रुपये ५५,०००/- ही पेयु वॉलेटवर गेल्याचे दिसून आल्याने तात्काळ संबधित कंपनीसोबत पत्रव्यवहार करुन संबधित व्यवहार रद्द करून तक्रारदार यांची फसवणूक झालेली रक्कम मुळ क्रेडीट कार्डवर जमा करण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **क्रेडीट कार्ड द्वारे व्यवहार करताना त्याची माहिती कोठेही सेव्ह करू नये.**
- **क्रेडीट कार्ड वापर कर्त्याने ट्रान्सक्शनचे प्रत्येक एसएमएस तपासावे, त्यामध्ये काही अनियमितता असल्यास तात्काळ संबंधित बँकेस व सायबर सेलकडे तक्रार करावी.**
- **कोणताही अनोळखी कॉल आल्यास क्रेडीट कार्ड/बँकेशी संबंधित माहिती देवू नये.**
- **बँक/क्रेडीट कार्ड संबंधित ओटीपी शेअर करू नये.**

**मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे क्रेडीट कार्ड/बँक व्यवहारामध्ये फसवणूक झाल्यास तात्काळ संबंधित बँकेला माहिती द्यावी, तसेच नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति. कार्यभार पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पो.उप.निरी. प्रसाद शेनोळकर, म.पो.अं. माधूरी धिंडे, सुवर्णा माळी, म.सु.ब.सुरज बोरसे यांनी केलेली आहे.

----------------0000-------------------